आपण हा लेख www.maanavta.com या अध्यात्मिक वेबसाईट वर वाचत आहात.

संपादकीय

जगण्याची योग्य दिशा - धर्माची भुमिका

लेखक – श्री. राम कुमार 'सेवक' जी मुख्य संपादक – www.maanavta.com

मला वाटतय की धर्माचा मुळ (खरा) अर्थ मानवास जीवन जगण्याची कला शिकवणे हा असायला हवा, जगण्याची दीशा दाखवणे असायला पाहीजे, कारण जोपर्यत मानव जगणे शिकणार नाही तोपर्यत तो सुखी होऊ शकत नाही.

ही आवश्यकता याच्याकरीता सुध्दा आहे की, दररोज आम्हाला अनेक प्रश्नांना सामोरे जावावे लागते, आणी एकाच प्रश्नाचे अनेक (वेगवेगळे) उत्तरे असु शकतात. ज्या प्रकारे चार अंध व्यक्तींना एक माणसाने विचारले होते की, तुमच्यासमोर जो उभा आहे तो काय आहे?

समोर तर हत्ती उभा होता. परंतू अंधत्वाच्या कारणास्तव त्या व्यक्तींना स्पर्शानेच सत्यापर्यत (ओळख) पोहचायचे होते. ज्या व्यक्तीचा स्पर्श हत्तीच्या शेपटीला झाला त्याने दोर सांगितला. जो हत्तीच्या पायापर्यत पोहचला त्याने त्यास स्तंभ (खांब) सांगितला. ज्याचा स्पर्श कानांना झाला त्याने त्यास पंखा समजला. ज्याचा स्पर्श सोंडेशी झाला त्याने त्यास झुळा (झोका) समजला. वास्तवतेपर्यत कुणीच पोहचु शकलं नाही. कारण डोळयात सत्य बघण्याची क्षमताच नव्हती. खरे उत्तर होते–हत्ती, परंतु निष्कर्षावर आधारित असल्याकारणाने सर्वांची उत्तरे वेगवेगळी होती, ज्याला ज्या बाबतीत जितके ज्ञान असेलं तो त्या ज्ञानानुसारचं उत्तर समजत असतो. तिरंदाजीच्या स्पर्धेत विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तराने हे सिध्द करून दिले की, अर्जुनाचे त्या विषयाचे ज्ञान सर्वाधिक होते.

प्रत्येक दिवशी आम्ही नव–नवीन घटनांना तोंड देत असतो. प्रत्येक घटना एक आव्हानच असते. आव्हान स्वयंमेव एक प्रश्न असतो. त्या प्रश्नाचे खरे उत्तर काय आहे, हे धर्माद्वारे समजवीले जावयास हवे.

श्रीरामजीं च्या समोरही खुप कठीण परिस्थिती होती. वडील त्यांना राजपाट देण्यास इच्छुक होते, परंतु आईची बळजबरी वनवासास पाठवण्याची होती. पिता दशरथ आपल्या पत्नीच्या दबावामुळे आपली इच्छा पूर्ण करू शकत नव्हते, म्हणून वनवासाच्या हुकूमावर स्वाक्षरी करून दिली, सांगण्याचा अर्थ हाच आहे की, वनवासाला जाण्याचा आदेश दिला. प्रत्येकाला हे माहीत होते की, राजगादीचे खरे उत्तराधीकारी श्रीरामजी आहेत आणि बहुसंख्य जनता त्यांच्या सोबत होती. वाटल्यास ते विद्रोह करू शकले असते, परंतु त्यांनी आनंदाने पिता आज्ञाचे पालन केले.

विचारणीय बाब ही आहे की, जर आम्ही रामजीं च्या जागेवर असतो तर काय केले असते? कमीत कमी ते तरी निश्चित केले नसते जे रामजींनी केले. न्यायालयात ज्याप्रकारे पिता–पुत्र, पती–पत्नी, भाऊ–भाऊंच्या तक्रारी चालु आहेत, (ते ही छोटया–छोटया संपत्तीसाठी) त्या तर माझ्याच उत्तराचे समर्थन करीत आहेत. प्रत्येक ठिकाणी स्वधीकारांचीचं शर्यत चालु आहे, या परिस्थतीतं वनवासाला जाण्याचा पर्याय कुणीही स्विकारणार नाही. रामजींनी त्यागाचा मार्ग स्विकारला ज्यायोगे ते मर्यादा पुरूषोत्तम म्हणुन गौरविले गेले. त्यावेळी मुलींची स्थिती आजपेक्षा सुवस्थेत असेल कारण विवाह करण्याकरीता रामाजींना आपल्या सासऱ्यांनी ठेवलेल्या कठीणपणास पूर्ण करावे लागले. आज तर मुलींच्या वडीलांना सुळावर चढवले जातेय. ते ही हतबल बोकडासारखे. तो प्रत्येक बाब मान्य करण्यासाठी तत्पर राहतो, जेवढया मागण्या वाढत जातात तेवढाच तो घटत जातो. या परिस्थितीस कोण बदलवणार? धर्माने मानवामध्ये ही परिस्थिती बदलवण्यासाठी आत्मीक शक्ती निर्माण करावयास हवी.

एकच (मनुष्य) व्यक्ती असतो, ज्यावेळी मुलीचे लग्न करीत असतो त्यावेळी तो हतबल, नम्र आणि दयाळु असतो. जेव्हा मुलाचे लग्न करतो त्यावेळी तो साहसी, गर्वीष्ट आणि मालका (धनी) सारखे वर्तन करतो. तो हे विसरतो की, समोरच्याची जी परिस्थिती आहे ती कधी त्याची ही होती म्हणजे सासु ही कधीतरी सुन होती,

परंतु सासु झाल्यावर ती जुने दिवस विसरून जाते आणि सुनेवर आपला अधिकार गाजवते. बऱ्याचवेळा तर पाषाण हृदयीही होते, सर्वच माणसं अशी नाहीत, काही चांगलीही लोक आहेत, पण त्यांची संख्या अत्यल्प आहे.

असे नाही आहे की, व्यक्ती सत्यापासुन अनभिज्ञ आहे, परंतु तो सत्यास स्विकारण्यास तयार नाही. पहिल्यांदा यथेच्छ पाप करा आणि नंतर गंगा स्नान करणे ही आमची जुनीच परंपरा आहे. गंगा स्नान जर धार्मिक होण्याचे सुचक असते, तर मगर–मासे सर्वाधिक धार्मिक राहिले असते, परंतु पाप करण्याच्या ओढीत आम्ही या सत्यास स्विकारत नाही. जगण्याचा हा कर्मकांडी तथा अंधविश्वासी भाव परीवर्तनाची अपेक्षा करतोय. माणसाला आपले मानांकन बदलावी लागतील, या दीशेत विचार मंथन केल्यावर आम्ही हया निष्कर्षावर पोहचतो की,

- पदार्थापेक्षा अग्रस्थान मानव आणि मानवतेस दिले जावे.
- भुतकाळाच्या मजबुत पायावर वर्तमान आणि भविष्याची निर्मिती होते त्याकरीता आपल्या गतकाळास विसरू नये.
- काल ज्या दया व प्रेमाची आम्हाला आवश्कयता होती, आणि ते कुणी आम्हास दिले, तर परत करण्याच्या वेळी आम्हास कंजुषी करावयास नको, त्यापेक्षा ते व्याजासहीत परत करण्यासाठी प्रयत्न करावयास हवा.
- आस्थे (प्रेम) ने आत्मशक्ती वाढली पाहिजे. जर आत्मशक्ती न वाढता, भिती, शंका वाढत असतील तर आस्था एक ओझ्याचं रूप घेत, आस्थेचा आधार 'सत्य' असायला हवा 'स्वार्थ' नव्हे.

जगात जितके प्रचलीत धर्म आहेत, त्या सर्वात कर्मकांडांचासुध्दा समावेश आहे, परंतु कर्मकांड धर्माचे मुळ रूप नाहीत. धर्माचा खरा अर्थ आहे, – 'सत्य' अर्थात परमपिता परमात्मा ज्यावेळी आम्ही एकाच परमपिता परमात्माची लेकरं म्हणून स्वत:चा आणि इतर सर्वांचा स्विकार करतो, त्यावेळी दया, प्रेम, करूणा, शांती इत्यादी गुण स्वभावात येण्याची शक्यता निर्माण होते, परंतु फक्त ईश्वराची लेकरं होण्यावर न थांबता, भगवतांच्या लेकरात जी सहनशिलता, विशालता, दया, प्रेम, करूणा आणि शांती असवयास हवी ती ही जीवनात यावसास हवी, त्याचवेळी जगण्याच्या योग्य दीशेला आपले प्रथम पाऊल पडेल.

हे काम अवघड नाही, परंतु जीवनात बरेच कठीण काम सुध्दा आम्ही करीतच असतो, मग या कठीण कामाची सुरवात सुध्दा का न करावी? शेवटी याच्यात आमचेच तर हीत आहे. जगण्याची योग्य दिशा निवडण्याचा फायदा तर आम्हालाच होईल.

राम कुमार 'सेवक'
rksewak@yahoo.co.in

अनुवादक
सुकदेव पाटील
sukdeo_behere@yahoo.co.in